# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन अद्ययावत करण्यासाठीच्या मुदतवाढीबाबत (Ph. D. Tracking System 2016).**

विद्यापीठ विभाग व संशोधन केंद्र येथे पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी **Ph.D. Tracking System** सुरू करण्यात येणार असून याकरिता सदर अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन प्रक्रियेत अद्ययावत असणे आवश्यक आहे.

परिपत्रक क्र. २०५/२०१६ दि. ०५/१२/२०१६ अन्वये विद्यापीठाच्या **bcud.unipune.ac.in** या संकेतस्थळावरून दि. ३१/१२/२०१६ पर्यंत माहिती अद्ययावत करण्याबाबत सर्व संबधिताना कळविण्यात आलेले आहे. तथापी, अद्यापही काही संशोधन केंद्र व विद्यार्थ्यांनी माहिती अद्ययावत केलेली नाही.

यासंदर्भात पुनश्च: कळविण्यात येते की, पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना माहिती अद्ययावत करण्यासाठीची मुदत **दि. १५/०१/२०१७** पर्यंत वाढविण्यात आलेली असून, विद्यापीठ विभाग/संशोधन केंद्र यांनी विद्यार्थ्यांनी अद्ययावत केलेली माहिती Online Confirm करून अद्ययावत माहिती शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे **दि. ३१/०१/२०१७** पर्यंत सादर करावी.

**<u>महत्वाच्या सुचना :–</u>**

- विद्यार्थ्यांनी व संशोधन केंद्रानी यापूर्वीच्या परिपत्रकात दिलेल्या सूचनेनुसार माहिती अद्ययावत करावी.
- संशोधन केंद्रातील ज्या मार्गदर्शकांची माहिती BCUD Online मध्ये अद्ययावत केलेली नसेल अशा मार्गदर्शकांची माहिती प्रथम त्या त्या संशोधन केंद्रानी अद्ययावत करणे आवश्यक आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना आपली माहिती भरण्यास अडचणी येणार नाहीत.
- पीएच. डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच ज्या विद्यार्थ्यांचे Provisional Admission झालेले असेल किंवा Synopsis/Thesis सादर केलेले असेल अशा सर्व विद्यार्थ्यांनी सुध्दा आपली Online माहिती अद्ययावत करणे अनिवार्य आहे.

**ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :–**

- मोबाईल क्रमांक :– 7038408091
- ई–मेल आयडी :– phdtracking_support@pun.unipune.ac.in

विद्यार्थ्यांनी संशोधन केंद्रामार्फत Ph. D. Tracking System मध्ये नोंदणी करणे बंधनकारक असुन नोंदणी नसलेल्या विद्यार्थ्यांची पीएच.डी. अभ्यासक्रमासंदर्भातील पुढील कोणतीही प्रक्रिया केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

30/12/2016.

उपकुलसचिव,
**शैक्षणिक प्रवेश विभाग**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/५०९५
दिनांक : ३०/१२/२०१६

**प्रत :–**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात/संशोधन केंद्रात पीएच. डी. अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

Desktop/19-11-2016/Circular Ph. D. Tracking